# सामुहिक वन हक्क व  रोजगार हमी योजनेसोबत विविध यीजनांचा समन्वय आणि विकास

लढेंगे-जितेंगे

लोकसंघर्ष मोर्चा

नंदुरबार जिल्ह्यात लोक समन्वय प्रतिष्ठानस्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने सामुहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे प्रकल्प अंतर्गत पहिल्या टप्प्यातील २५ गांवे व दुसऱ्या टप्प्यातील ७ गांवे अश्या ३२ गावांमध्ये आम्ही या गावांचे कृती आराखडे तयार केले

या कृती आराखाड्यां मध्ये वनीकरण, मृदा व जल संवर्धन, वनउपज संवर्धन व संकलन आणि गावात वने व शेती आधारित स्वयंरोजगार निर्मिती या कामांवर भर दिला आहे

सामुहिक वनक्षेत्राचे संवर्धन व व्यवस्थापन करतांना त्यात शासनाच्या सर्व योजनांचे कन्व्हर्जन करत रोजगार हमीच्या कामांचा जास्तीत जास्त कसा उपयोग करता येईल या साठी संघटीत प्रयत्न सुरु आहेत

**पर्यावरण** • १ लाख ८६ हजार रोपे लावली जाणार, आदिवासींना मिळणार उत्पन्नाचे साधन

## ‘रोहयो’ची जोड देत सामूहिक वनहक्क क्षेत्रात १०४ हेक्टरवर वृक्षारोपण; वनराई वाढणार

**लोकसमन्वयक प्रतिष्ठान, वन समितीचे सहकार्य**

प्रतिनिधी | नंदुरबार

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सामूहिक वनहक्क क्षेत्रावर एक लाख ८६ हजार रोपांची लागवड करण्यात येणार आहे. आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध करून देत ग्रामीण भागाला सक्षम करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचा दावा जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या उपक्रमात हंगामी उत्पन्न देणारी रोपे लावण्यात येणार असल्याने भविष्यात आदिवासी बांधवांना कायमस्वरूपी रोजगाराचे साधन उपलब्ध होईल. त्यामुळे त्यांचे स्थलांतर थांबेल. या उपक्रमामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल. तसेच आदिवासींना उत्पन्नाचे साधन मिळेल. त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यास मदत होईल.

शासन, प्रशासन, गावस्तरावरील वन नियोजन समिती आणि लोकसमन्वयक प्रतिष्ठानच्या सक्रिय सहभागातून वनकव्यवहाराच्या मूळ उद्देशाकडे वाटचाल सुरू आहे. वृक्षारोपण अभियानांतर्गत सामूहिक वनहक्क क्षेत्रावर एक हेक्टर क्षेत्रात एक हजार १११ याप्रमाणे सामाजिक वनीकरण विभागामार्फत १०४ हेक्टरवर एक लाख ९५ हजार ५४४ तर वन विभागातर्फे ६४ हेक्टर क्षेत्रावर ६२ हजार २२६ रोपांची लागवड करण्यात येणार आहे. वृक्षारोपणासाठी सामूहिक वनहक्क क्षेत्राची निवड करण्यात आली आहे. त्यात नंदुरबार तालुक्यातील बाघाळे, अंबापूर, सुतारे, अजेपूर, अक्कलकुवा तालुक्यातील सरी, दहेल, वालंबा, रोजकुंड, भगडपादर, खाई, गुलीआंबा, भगदरी, कुंडी या तेरा गावांतील १०४ हेक्टरवर सामाजिक वनीकरण विभागातर्फे एक लाख ९५ हजार ५४४ रोपे लावण्यात येतील. तसेच उपवनसंरक्षक नंदुरबार वन विभाग शहादातर्फे बुरुमपाडा, तोरणमाळ प., सिंधी, लेगापाणी, निगदी, कुंभरी या गावातील प्रत्येकी आठ हेक्टरप्रमाणे ४८ हेक्टर क्षेत्रावर ५३ हजार ३२८ वृक्ष लावण्यात येतील. उपवनसंरक्षक मेवासी वनविभाग, तळोदा विभागामार्फत अमोणी आणि माल्दा या गावातील १६ हेक्टर क्षेत्रावर १७ हजार ७७६ वृक्ष लावण्यात येतील. या उपक्रमांतर्गत आंबा, जांभूळ, चिंच, बोर, आवळा, सीताफळ, बेल, शेवगा, कवठ, खैर, बांबू, कडुनिंब, पेरू, आवळा, वड, बेहडा आदी उपयुक्त वृक्ष लावण्यात येतील. या निर्णयामुळे जिल्ह्यात वनराई वाढण्यासह दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना भविष्यात आर्थिक लाभ होऊ शकतो. ग्रामीण भागातील नागरिकांची क्रयशक्ती वाढून रोजगारासाठी होणारे हंगामी स्थलांतराचे प्रमाण कमी होईल. ग्रामीण भागातून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून नागरिकांच्या सहभागामुळे वृक्षारोपणाला गती मिळाली आहे. सामाजिक वनीकरण आणि वनविभागाच्या माध्यमातून रोपे उपलब्ध करून देण्यात येत आहे. मग्रारोहयोच्या माध्यमातून ग्रामस्थांना गावातच काम उपलब्ध होत असल्याने या उपक्रमाचा दुहेरी फायदा त्यांना मिळणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत उपक्रमाच्या क्रियान्वयनावर लक्ष दिले जात असून कामाचा आढावा घेण्यात येत आहे. या उपक्रमाच्या वनराई निर्माण होणार आहे. विभागीय वन अधिकारी अ.के. धानापुणे, उपवनसंरक्षक एस.बी. केवटे, अनिल थोरात, प्रतिभा शिंदे, लोकसमन्वयक प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय महाजन आदी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**आंबा, जांभुळ, चिंच, बोर, आवळा, सीताफळ, बेल, शेवगा, कवठचे रोप लावणार**



वृक्षारोपण करताना जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे यांच्यासह मान्यवर.



वृक्षारोपण करण्यासाठी खोदण्यात आलेले खड्डे.

**तीस गावे होणार हरित....**

*जिल्ह्यातील ३० आदिवासी गावांनी वन अधिकाराच्या माध्यमातून गाव हरित करण्याचा संकल्प केला आहे. मनरेगाची जोड देत गावात रोजगार उपलब्ध करून देत दोन लाख फळझाडे व इतर उपयुक्त रोपे लावण्यात येणार आहेत. त्यातून ग्रामसभेला उत्पन्न मिळेल. या उपक्रमातून गावे अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.*

-प्रतिभा शिंदे, सामाजिक कार्यकर्त्या, नंदुरबार

**अजेपूर येथे कार्यक्रम....**

अजेपूर येथे सामूहिक वनहक्क क्षेत्रातील आठ हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. याठिकाणी केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत प्रशिक्षण महासंचालनालयाचे महासंचालक राजेश अग्रवाल, जिल्हाधिकारी बालाजी मंजुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले.

**आदिवासी होणार सक्षम...**

*जिल्ह्यात सामूहिक वनक्षेत्रावर वृक्षारोपणाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यातून ग्रामीण भागाचा विकास होईल. दुर्गम भागातील आदिवासींना सक्षम करण्यासाठी अनेक स्तरावर होत असलेल्या प्रयत्नाचा हा एक भाग आहे.*

-बालाजी मंजुळे, जिल्हाधिकारी, नंदुरबार

**लोकमत**

## रोहयोअंतर्गत शेतात वृक्ष लागवडीला प्राधान्य

**आढावा बैठक : उत्पन्न वाढीसाठी उपक्रम, जिल्हाधिकाऱ्यांची माहिती**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** रोजगार हमी योजनेअंतर्गत शेताच्या बांधावर आणि शेत जमिनीवर सामाजिक वनीकरण विभागामार्फत वृक्ष लागवड कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळावा हा उद्देश त्यामागे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.राजेंद्र भारुड यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगा संदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, उपजिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपवनसंरक्षक अनिल थोरात, सामाजिक वनीकरण विभागाचे उपसंचालक ए.के.दानापुणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाटील उपस्थित होते.

डॉ.भारुड म्हणाले, कागद उद्योगासाठी सुबाभूळला चांगली मागणी आहे. सुबाभूळची लागवड केल्याने शेतकऱ्याला वर्षभराच्या मजुरीसोबत झाडापासून उत्पन्न मिळते. १०० रोपांसाठी तीन वर्षात ५० हजार ६९५ तर प्रति हेक्टरी २५०० रोपांसाठी लागवडीपूर्व ते प्रथम वर्षासाठी एक लाख ३१ हजार ४०६ रुपये देय आहेत. **या कार्यक्रमामुळे वर्षभर रोजगार उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांनी वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ४१ शेतकऱ्यांच्या एक लाख १७ हजार झाडांच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

साग, चंदन, खाया, निम, चारोळी, मोहगणी, आवळा, हिरडा, बेहडा, अर्जुन, सीताफळ, चिंच, जांभूळ, बाभूळ, अंजन, बिबा, खैर, काजू, आंबा, फणस, ताड, सिंदी, सुरु, शिवण, शेवगा, हादगा, कढीपत्ता, महारुख, म्यान्जीयम, मेलिया या पैकी कोणत्याही प्रजातीची निवड करता येईल. निलगिरी व सुबाभूळसाठीदेखील शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करण्यात येणार आहे.

इच्छुक लाभार्थी जॉबकार्डधारक असावा व त्याच्यानावे जमीन असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायती वृक्षाच्या बाबतीत ९० टक्के व कोरडवाहू किमान ७५ टक्के झाडे जिवंत ठेवल्यास त्याला अनुदान देय असेल.

Hello Nandurbar
Page No. 1 Aug 03, 2019
Powered by: erelego.com

या गावांमध्ये मागील वर्षी १७ गावांमध्ये प्रत्येकी ८ हेक्टर वनक्षेत्रात हेक्टरी ११०० या प्रमाणे वनविभाग व सामाजिक वनीकरण या यंत्रणांच्या माध्यमातून रोजगार हमीतून कामे केलीत







या वर्षीही विशेषतः कोविड-१९ महामारीच्या काळात जेव्हा गावात रोजगाराची खरी गरज आहे त्या वेळी आम्ही या सर्व गावांसह ईतर नवीन गावे जि त्यांच्या गावात कृती आराखडा बनवून सामुहिक वनक्षेत्रात वन संवर्धन व व्यवस्थापन करू इच्छितात अश्या अनेक गावात आम्ही किमान २५ हेक्टर सामुहिक वन क्षेत्रात बांबू लागवडी







सकाळ

# वन व्यवस्थापनातून रोजगार

## अविशांत पंडा : आत्मनिर्भरतेसाठी आराखड्याचे आवाहन

सकाळ वृत्तसेवा

तळोदा, ता. ९ : गाव वनव्यवस्थापन कृती कार्यक्रमांद्वारे ग्रामस्तरावर कामे उपलब्ध होणार आहेत. ग्रामस्थांना रोजगार मिळणार असून ग्रामस्थ स्वयंभू, आत्मनिर्भर होणार आहेत. जंगल पुनर्जीवित होऊन गावांचा सर्वांगीण विकास देखील साधला जाणार आहे. यासाठी सर्व विभागांनी १ ऑक्टोबरपर्यंत वनव्यवस्थापन कृती आराखडा तयार करावा, असे आवाहन साहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी अविशांत पंडा यांनी केले.

सामूहिक वनहक्क अंतर्गत गाव वन क्षेत्रात तयार करावयाच्या कृती आराखडा संदर्भात शहरातील आदिवासी सांस्कृतिक भवनात जिल्हास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. लोक संघर्ष मोर्चाच्या प्रणेत्या प्रतिभा शिंदे, तहसीलदार पंकज लोखंडे, साहाय्यक प्रकपाधिकारी अमोल मेटकर, शैलेश पटेल, एस. डी. जानगर, सुहास डोमतोंडेकर, नायब तहसीलदार शैलेंद्र गवते, वनक्षेत्रपाल नीलेश रोडे, कृषी अधिकारी नरेंद्र महाले, लोक संघर्ष मोर्चाचे संजय महाजन, जिल्हा परिषद सदस्य गणेश पराडके आदी उपस्थित होते.

प्रतिभा शिंदे यांनी सांगितले की, प्रशासनाने कृषी व्यवस्था, वन संवर्धन तसेच शेवटच्या घटकांपर्यंत पायाभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. त्यासाठीच गाव वनव्यवस्थापन ही संकल्पना आहे. सर्व विभागांनी एकत्र येत पुढील १० वर्षांचा विचार करून गावाचा विकास आराखडा तयार करायचा आहे. कोरोना संकटामुळे पुरेशी काळजी घेत संबंधित गावातील



तळोदा : बैठकीत बोलताना प्रकल्पाधिकारी अविशांत पंडा. शेजारी प्रतिभा शिंदे, तहसीलदार पंकज लोखंडे, अमोल मेटकर, शैलेश पटेल, एस. डी. जानगर आदी

Nashik, Dhule-Today
10/09/2020 Page No. 4

**Feedback At ::**
**9403989007, 9766232322**
**samrat.mahajan0013@gmail.com**







# आदीवासींना गौण वन उपज गोळा करण्याची सूट

## शासनाच्या आदेशाने दिलासा

जळगाव : लॉकडाऊनच्या काळात आदिवासी क्षेत्रात अगोदरच रोजगार बुडाल्यामुळे गंभीर समस्या उदभवलेली आहे. त्यात एप्रिल व मे हा जंगलातील महुफुलें, तेंदूपाने, कैऱ्यांचा गर काढून त्याचे काप आमचूर म्हणून तयार करण्याचा, डिंक व इतर गौणवन उपज गोळा करण्याचा महत्वाचा हंगाम आहे. परंतु लॉकडाऊनमुळे तो ही हातातून जाणार की काय ही भीती होती परंतु



ी क्षेत्रात प्रधान मंत्री वन
माध्यमातून ही जाणीव
केली आहे.

समन्वय प्रतिष्ठाण व
मोर्चा यांच्या वतीने
ल्ह्यातील निमड्या या
मोहाची फुले गोळा
शी काळजी घेतली
वषयीची माहिती लोक
तेष्ठान व लोक संघर्ष
तिभा शिंदे व यावल
विकास प्रकल्पाच्या
कारी विनिता सोनवणे

यांनी मार्गदर्शन केले.तसेच गावात मास्क व साबण यांचे वाटप केले गेले. आदिवासी विकास महामंडळ मार्फत ह्या गावातील स्थापित वनधन केंद्राला महुवा, डीक खरेदी करण्यासाठी पाच लाख रुपये बिन व्याजी देणार आहेत.यामुळे वनधन केंद्राचे अध्यक्ष इरफान पटेल यांनी सांगितले की हे पैसे आल्यानंतर गावातच महुवा खरेदी करून साचवून ठेवता येईल व योग्य किंमत यात मिळेल ह्या वेळी सरपंच जुवांसिंग बारेला, लोक संघर्ष मोर्चाचे नेते रमेश बारेला, मीना तडवी, विनिता बारेला ई.हजर होते.या

> केंद्र व राज्य शासनाने मंजुरी दिल्याने आदिवासी क्षेत्रात गौण वन उपज गोळा करणे सुरू वनधन केंद्रांना मिळालेल्या बिनव्याजी कर्जामुळे गावात महू गोळा करण्यासाठी सोय झाली असून लॉकडाउननंतर योग्य भावात ते विकता येतील व आत्ता महू फुल गोळा करणाऱ्यांना आत्ता त्याचा मोबदला ही देता येईल ही समाधानाची बाब आहे.
>
> **– प्रतिभा शिंदे,**
> लोकसंघर्ष मोर्चा

प्रकारचे शिबिर सोमवारी चोपडया तालुक्यात सत्रासेन,कर्जना येथे घेण्यात येणार असून नंदुरबार जिल्ह्यातही अक्कलकुवा धडगांव व तळोदा तालुक्यात अश्या पद्धतीने जाणीव जागृती केली जाणार आहे.



# वनसंवर्धनातून रोजगारासाठी आराखडा करा

## जिल्हाधिकारी राऊत : सामूहिक वनहक्क जिल्हा कन्व्हर्जन समितीची बैठक

सकाळ वृत्तसेवा

**जळगाव, ता. २९ : यावल अभयारण्य क्षेत्रातील गावे, चोपडा परिसरातील आदिवासी गावांमध्ये वनसंवर्धन व त्यातून रोजगारनिर्मितीवर भर द्यावयाचा आहे. ज्यातून या गावांमध्ये लोकांची उपजीविका व जीवनमान उंचावता येईल. यासाठी असा कृती आराखडा तयार करा की सर्व विभागांच्या योजना येथे राबविता येतील व नागरिकांचे जीवनमान उंचावता येईल, यासाठीचा कृती आराखडा लवकरच तयार करून सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी येथे केल्या.**



जळगाव : सामूहिक वनहक्क जिल्हा कन्व्हर्जन समितीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी अभिजित राऊत. शेजारी प्रतिभा शिंदे, सचिन धांडे, डॉ. बी. एन. पाटील आदी.



> **ही प्रक्रिया लोकांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने शासकीय यंत्रणेने आपापल्या विभागांच्या योजनांच्या समन्वयातून या भागात नावीन्यपूर्ण कार्यक्रम राबवून चांगल्या पद्धतीने योजना राबवूया. त्यासाठी पुढील बैठकीत सर्व विभाग आणि गाव व्यवस्थापन समिती सदस्यांसोबत नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**
>
> **– अभिजित राऊत, जिल्हाधिकारी**

जिल्ह्यातील सामुदायिक वनाधिकार प्राप्त गावांमधील वनव्यवस्थापन व संवर्धन कृती आराखडे तयार करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी राऊत यांच्या अध्यक्षतेखाली सामूहिक वनहक्क जिल्हा कन्व्हर्जन समितीची आढावा बैठक आज झाली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बी. एन. पाटील, उपवनसंरक्षक होशिंगे, निवासी उपजिल्हाधिकारी राहुल पाटील, रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी प्रसाद मते आदी अधिकाऱ्यांसह लोकसंघर्ष मोर्चाच्या अध्यक्षा प्रतिभा शिंदे, सचिन धांडे, लोकसमन्वय प्रतिष्ठानचे संजय महाजन उपस्थित होते.

वनहक्क कायदा-२००८ नुसार सामूहिक वनहक्क प्रदान करण्यात आलेल्या गावांमध्ये मिळालेल्या सामूहिक वनक्षेत्राचे व्यवस्थापन व संवर्धन करण्यासाठी त्यांचे कृती आराखडे तयार करण्यासाठी लोकसमन्वय प्रतिष्ठान ही संस्था कार्यरत आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यातील निवडलेल्या १८ गावांमध्ये गावसमित्या तयार करून कृती आराखडे तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्याबाबतीत अध्यक्षा शिंदे यांनी मांडणी केली.

यावेळी यावल अभयारण्य क्षेत्रातील गावे, चोपडा परिसरातील आदिवासी गावांमध्ये वनसंवर्धन व त्यातून रोजगारनिर्मितीवर भर द्यावा लागेल. ज्यातून या गावांमध्ये लोकांची उपजीविका व जीवनमान उंचावता येईल म्हणून या कृती आराखड्यात सर्व विभागांच्या योजनांचा समन्वय करून विकासकामे करता येतील. स्थानिक नैसर्गिक संसाधनांचे रक्षण व संवर्धनही होईल, असे सांगत सर्व विभागांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीला प्रकाश बारेला, ताराचंद पावरा, इरफान तडवी उपस्थित होते.



# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## लेबर बजेट २०२१-२२ चे नियोजन व वार्षिक कृती आराखडा तयार करणे तसेच २०२०-२१ चे पूरक आराखडा तयार करणे

## रोजगार हमी योजनेचे ३ महत्वाचे जीआर

| | | |
|---|---|---|
| दिनांक :- 02 सप्टेंबर, २०२० | महाराष्ट शासन नियोजन विभाग (रोहयो)<br>शासन परिपत्रक क्र. : मग्रारोहयो - २०२०/प्र.क्र.21/रोहयो-७ | महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेतुन गाव समृद्ध करण्याकररता माहित्या, प्रशीक्षणे आणि जाणीवा. |
| दिनांक :- ५ ऑगस्ट २०२० | महाराष्ट शासन नियोजन विभाग (रोहयो)<br>शासन परिपत्रक क्र. : मग्रारोहयो - २०२०/प्र.क्र.21/रोहयो-७ | **लेबर बजेट २०२१-२२ चे नियोजन व वार्षिक कृती आराखडा तयार करणे तसेच २०२०-२१ चे पूरक आराखडा करणे बाबत** |
| ग्रामीण विभाग व ग्रामीण विकास मंत्रालय | **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधीनियम २००५** | **मुख्य परीपत्रक -कार्यक्रम अंमलबजावणी मार्गदर्शिका आर्थिक वर्ष -**२०२०-२१ |

# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

## लेबर बजेट २०२१-२२ चे नियोजन व वार्षिक कृती आराखडा तयार करणे तसेच २०२०-२१ चे पूरक आराखडा तयार करणे

मुख्य दोन उदिष्ट्ये

१) मागेल त्याला काम उपलब्ध करून देणे व या कामातून सामुहिक आणि वैयक्तिक पायाभूत सुविधा उपलब्ध करणे

२) सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे ज्याने गावे समृद्ध होतील

# सन २०२०-२१ चा रोजगार हमी कामांचे नियोजन व वार्षिक कृती आराखडा तयार करण्याचे मुख्य उद्देश

- नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करून राज्यातील सर्व गांवे समृद्ध करणे तसेच अकुशल कामे मागणाऱ्यांची संख्या हळूहळू कमी करणे
- महाराष्ट्रातील ग्रामीण भाग हा कृषी प्रधान आहे या ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था हि कृषी व पशुपालानावर तसेच जल जंगल जमीन या नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून आहे म्हणून शेती व नैसर्गिक संसाधनांशी निगडीत कामे प्राधान्याने घेतल्यास गावांचा झपाट्याने विकास होईल म्हणून मनरेगा अंतर्गत मिशन वॉटर कन्झरवेशन  तालुक्यांमध्ये किमान ६५ टक्के कामे मृदा व जलसंधारणाची कामे तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये कृषी व कृषी संलग्न कामे घेणे अपेक्षित आहे
- मनरेगा सोबत इंतर योजनांचे अभिसरण करून उत्पादक मत्ता निर्माण करण्यावर भर

## या योजनेतून साध्य करायची उदिष्ट्ये व निकष

१) गावातील शेतकऱ्याचे हेक्टरी उत्पन्न वाढतांना दिसेल व त्यातून दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या कमी होईल

२) अकुशल मजुरीसाठी गावातून होणारे स्थलांतर थांबेल

४) मुलांचे व गरोदर मातांचे कुपोषण कमी होतांना दिसेल

५) स्थलांतर थांबल्याने शाळेत १००% मुलांची हजेरी नियमित होईल

# वार्षिक कृती आराखड्यात सामाविष्ट्य करण्यासाठी कामांचे प्रकार

मनरेगा योजने अंतर्गत २६२ कामांचे संयोजन अनुज्ञेय आहे (या कामांची यादी व यंत्रणा परीशिस्त्य ५ नुसार आहे)

ही कामे पुढील ४ प्रवर्गात विभाजित करता येतील

१) नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन यात मृदा व जलसंधारण, सूक्ष्म व लघु सिंचन साधनांची दुरुस्ती व देखभाल, वृक्ष लागवड फळबाग लागवड कुरण विकास ई. कामे

२) दुर्बल घटकांकरिता वैयक्तिक लाभाची कामे

३) राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा

४) ग्रामीण पायाभूत सुविधा

## ❖ कामे / उदिदष्टे -

**1) रोपवन लागवड क्षेत्र -**

गावात व गांवशिवारात असलेल्या वनक्षेत्रावर वनहक्क समितीमार्फत 0.30 मी. X 0.30 मी. आकाराचे प्रति हेक्टरी 1111 खड्डे खोदून त्यावर प्रति हेक्टरी 1111 रोप लागवड करणे. सदर रोपवन नमुन्यास केंद्र शासनाने मान्यता प्रदान केली आहे. स्थानिक परिस्थितीनुसार कोणत्य प्रकारची रोपे लागवड करावयाची आहेत त्याची निवड ग्रामसभेत चर्चा करून निश्चित करण्यात यावी,

**२) कुरण विकास –**

वनहक्क समितीस दिलेल्या वनक्षेत्रातील क्षेत्रात दरवर्षी 10 हेक्टर क्षेत्राची कुरण विकास गवत प्रजातींची लागवड संरक्षण व देखभाल करण्याचे काम वनहक्क समिती मार्फत करण्यात येईल.

**३) नैसर्गिक वनसंवर्धन व मृदजलसंधारण कामे :-**

वनहक्क समितीस दिलेल्या क्षेत्रात नैसर्गिक रोपांना मातीचा भराव देणे यासाठी दरवर्षी क्षेत्राची निवड करण्यात येईल. तसेच वनहक्क समितीस दिलेल्या वनक्षेत्रात मृद व जलसंधारण कामांतर्गत गलीप्लगींग, सलग समतल चर, वनबंधारे, वनतळी, मातीनाला बांध, दगडीनाला बांध, सिमेंट बंधारे, नाला सरळीकरण / नाला खोली व रुंदीकरण यासारखी कामे करून पावसाचे वाहून जाणारे पाणी थांबविणे, जमिनीत जिरविणे व वनतळी अथवा बंधाऱ्यात अडविणे याद्वारे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावयाचे आहेत. त्यामुळे जमिनीची धूप थांबविणे, नैसर्गिक पुनरूत्पत्तीस हातभार लागेल. सदर मृदा व जलसंधारण कामांचा क्षेत्रवार प्रकल्प आराखडा पहिल्या वर्षी गावकऱ्यांच्या सहभागातून तयार करण्यात येवून पुढील 4 वर्षात त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

## ४) वनव्यवस्थापनपूरक वैयक्तिक व गाव विकास कामे :-

अ. वनपट्टे धारक व इतर शेतकऱ्यांच्या शेतात बांधबंदिस्ती , सपाटीकरण , विहीर खोदणे, फळबाग लागवड, शेततळे ई. कामे घेणे

आ. गावातील लोकांना छोट्या गटात गटबांधणी करून त्यांना स्वयंरोजगारासंबंधी प्रशिक्षण देणे व बिजभांडवल उपलब्ध करून देणे.

इ. गावातील गौण वनउपज व शेतीमाल तसेच फळे इ. साठी साठवणूक, वाहतूक व बाजार व्यवस्था तयार करणे. त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग निर्माण करून रोजगार निर्मिती करणे.

ई. शेती विकास - गावात ठिबक सिंचन, शेततळे, विहीरी, सुधारित पिके, रोपवाटिका, फळे व फुले लागवड यासारखे कार्यक्रम राबविणे.

ई) पायाभूत विकास - गावात पक्के रस्ते, बंदिस्त गटारी, वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय, शाळा, अंगणवाडी, समाजमंदिर, व्यापारी गाळे, स्मशानभूमी यांची बांधकामे व दुरूस्ती करून पायाभूत संरचना उभारणे.

उ) गावात शैक्षणिक व आरोग्य विषयक सुविधांचे बळकटीकरण, देखभाल करणे व त्यात गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे.

ऊ) आदिवासी विकास विभाग, जिल्हा परिषदेचे संबधित विभाग तसेच राज्यशासन व केंद्र शासनाच्या अभियानाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध विकास योजनांबाबत गावपातळीवर माहिती उपलब्ध करणे व गावातील प्रत्येक कुटूंबातील किमान एका सदस्याला योजनेचा लाभ मिळवून देणे.

## ५) जनजागृती व कौशल्य विकास प्रशिक्षण :-

गावातील लोकांना रोजगार हमी कायदा वनहक्क कायदा, पेसा कायदा, सामुहिक वनहक्क इ. बाबत माहिती व्हावी, वनांचे संवर्धन व संरद्वाण करण्यासाठी जबाबदारी व कर्तव्याची जाणीव व्हावी म्हणून या संदर्भात गावातील भिंतीवर घोषणा रंगविणे, योजनेची माहिती, नियम व सूचना इ. चे फलक लावणे, माहिती घडीपत्रिका तयार करून प्रसार करणे,

गावात विविध दिन विशेषांच्या निमित्ताने मेळाव्याचे आयोजन करणे.

गावातील वलहक्क समिती तसेच वनसंरक्षण दल यांचेसाठी विविध कौशल्ये प्रशिक्षण व कार्यशाळेचे आयोजन करणे.

मृदु जलसंधारण कामे रोपवाटिका फळबाग लागवड कुरण विकास या सारख्या कामांच्या तांत्रिक बाबी त्यात करावयाची कामे यांची माहिती या विषयक प्रशिक्षण

# निधीच्या गरजेनुसार विविध विभागा अंतर्गत प्रस्तावित विकास कामे

| क्र. | विभाग | प्रस्तावित कामे | क्षेत्र व एकक | कूप नंबर | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १ | वन विभाग | दर्जा कमी झालेल्या वनांचे संवर्धन<br><br>निकृष्ठ वनांचा दर्जा उत्कृष्ट होणे आणि घनता वाढविणे हे या योजनेचे उदिष्ठे आहे. | | | |
| | | रोपवाटिका  तयार करणे.<br><br>रोपवाटिकेचे बळकटीकरण करणे, रोपवाटिका बाहेर कुंपण तयार करणे, पाईपलाईन , अंतर्गत रस्ते, अॅग्रोनेट शेड, रोपवाटिकेसाठी विविध आवश्यक साहित्य खरेदी करणे. रोपवाटिका संरक्षण मजुर लावणे. | | | |
| | | गौण वनोत्पादनाचा विकास<br><br>दर वर्षी २० हेक्टर वर बांबू लागवड<br><br>बांबू लागवड करणे, महुफुल, तेंदुपत्ता हिरडा, इ. गौण वनौपज लागवड करणे व त्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करणे. तसेच औषधी वनस्पतींचे उत्पन्न वाढविणे. | | | |
| | | प्रतिवर्ष ५ हेक्टर वर मिश्र झाड लागवड प्रती हेक्टर ११०० रोपे | | | |
| | | मृदा संवर्धन अंतर्गत सलग समतल चर (CCT) खोदणे | | | |
| | | दगडी शुष्क बंधारे बांधणे | | | |
| | | वनतलाव | | | |
| | | नाला बांध | | | |

# निधीच्या गरजेनुसार विविध विभागा अंतर्गत प्रस्तावित विकास कामे

| क्र. | विभाग | प्रस्तावित कामे | क्षेत्र व एकक | कूप नंबर | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | कृषी विभाग | शेततळे | | | |
| | | बांध बंदिस्ती | | | |
| | | मृदा व जल संधारण | | | |
| | | IFR शेतकर्याच्या बांधावर व शेतात फळबाग लागवड कार्यक्रम (कोरड वाहू) | | | |
| | | बागयती रोपवाटीकेची स्थापना | | | |
| | | शेतीपूरक जोड धंदे दुग्ध, शेतीमाल प्रक्रिया व शेती औजारे | | | |
| | | वैयक्तिक लाभार्थी योजना | | | |
| | | | | | |
| | पशुसंवर्धन विभाग | कुक्कुट पालन | | | |
| | | शेळीपालन | | | |
| | | दुधाळ जनावरे | | | |
| | | पशू आरोग्य व लसीकरण | | | |

# निधीच्या गरजेनुसार विविध विभागा अंतर्गत प्रस्तावित विकास कामे

| क्र. | विभाग | प्रस्तावित कामे | क्षेत्र व एकक | कूप नंबर | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | आदिवासी विकास विभाग | शेती सिंचन – डीझेल इंजिन, सौर उर्जा पंप व सयंत्र ,ठिबक संयंत्र | | | |
| | | वनव्यवस्थापन व संवर्धन समिती सदस्य प्रशिक्षण व सक्षमीकरण कार्यक्रम | | | |
| | | वैयक्तिक लाभार्थी योजना | | | |
| | | गौण वनउपज संकलन, खरेदी प्रक्रिया साठवणूक व विक्री या साठी आर्थिक मदत | | | |
| | | महिला व युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणे | | | |
| | | गावात संसाधन भवन | | | |
| | | पर्यटन स्थळ विकास | | | |
| | ग्रा.प. विभाग | गावातील पायाभूत सुविधा विकास | | | |
| | | जोड रस्ते गावांतर्गत रस्ते | | | |
| | | हातपंप व पिण्याच्या पाण्याची योजना | | | |
| | | गावात संसाधन व बहुउपयोगी भवन | | | |

# निधीच्या गरजेनुसार विविध विभागा अंतर्गत प्रस्तावित विकास कामे

| क्र. | विभाग | प्रस्तावित कामे | क्षेत्र व एकक | कूप नंबर | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | मस्यउद्योग | सामुहिक क्षेत्रातील तलाव व जलसाठ्यांमध्ये मस्यपालन | | | |
| | जिल्हा उद्योग केंद्र | मधु मक्षिका पालन | | | |
| | | दुग्ध व्यवसाय | | | |
| | | गृहउद्योग कर्ज व अनुदान | | | |
| | वनसंरक्षण उपाययोजना | १)वनहक्क समिती ग्रामसभेच्या मान्यतेने 6 ते 8 सदस्यांचे वनसंरक्षण दल तयार करणे<br>२) गावातील प्रत्येक कुटूंबातील 1 असे चार सदस्यांचा गट तयार करणे. वनसंरक्षणदलाचा एक सदस्य या गटाचे नेतृत्व करेल व या गटाचे वनात गस्त घालण्याचे नियोजन तयार करणे. | | | |
| | आगी पासुन वनांचे संरक्षण करणे | जाळ रेषा घेणे, अग्नि संरक्षण मजुर लावणे, वनवणवा प्रतिबंधक करण्यासाठी आवश्यक साधनसंपत्ती पुरवठा करणे. वनांचे अग्निपासून संरक्षण करण्यासाठी संवेदनशील भागात वॉच टॉवर उभारणी करणे. इ. | | | |
| | | | | | |
| | | | | | |

लढेंगे-जितेंगे

# लोकसंघर्ष मोर्चा

## धन्यवाद !!